क्रमांक : का.स./बैठक/२००

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १२ मार्च, २००३.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २० फेब्रुवारी, २००३ (गुरुवार) रोजी झालेल्या २०० व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

शासनाचे मुख्य सचिव - अध्यक्ष
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर - सदस्य
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे - सदस्य
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री.हरिशंकरन् - सदस्य
व्यवस्थापकीय संचालक,
स्कुलनेट इंडिया लिमिटेड,
बीजीएस अँड सन्स बिल्डींग,
१६६, सीएसटी रोड, कलिना, सांताक्रुझ (पूर्व)
मुंबई - ४०० ०९८.

शासनाचे प्रधान सचिव - सदस्य
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

महापालिका आयुक्त - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

शासनाचे प्रधान सचिव - सदस्य
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको, निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :

शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (पर्यावरण)
उर्जा व पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*********

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## कार्यकारी समितीच्या २०० व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : २० फेब्रुवारी , २००३ (गुरुवार)

वेळ : दुपारी १२.३० वाजता

सभास्थान : मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,
५ वा मजला, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**उपस्थित सदस्य :**

श्री.अजित निंबाळकर - अध्यक्ष
शासनाचे मुख्य सचिव

श्री.द.म.सुकथनकर - सदस्य

श्री.र.य.तांबे - सदस्य

श्री.रामानंद तिवारी - सदस्य
शासनाचे प्रधान सचिव,
नगर विकास विभाग

श्री.अरुण कुमार मागो - सदस्य
महानगर आयुक्त

**निमंत्रित :**

श्री.विश्वास धुमाळ
शासनाचे प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग व उर्जा विभाग
आणि
शासनाचे प्रधान सचिव (पर्यावरण)
(अतिरिक्त कार्यभार)
पर्यावरण विभाग

डॉ.टी. चंद्रशेखर
प्रकल्प संचालक/सह महानगर आयुक्त,

श्री.प्र.ल.बोंगिरवार
अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.वि.कृ.फाटक
प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
सचिव, कार्यकारी समिती (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वा.घांगुर्डे
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : दिनांक १८ नोव्हेंबर, २००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (१९९ व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्तात खालील सुधारणा करुन कार्यवृत्त कायम करण्यात आले :-

“बाब क्र.३: निधी प्रवाह तक्ता - सन २००२-०३ ते २००६-०७ पृष्ठ क्र.५ वरील परिच्छेद क्र.३.२ मधील ‘७.४ दशलक्ष हेक्टर’ याऐवजी ‘७.४ हेक्टर’ व याच परिच्छेदामधील

जागेचा दर 'रु.२५००/- प्रति चौ.मी.' याऐवजी 'रु.२५,०००/- प्रति चौ.मी.' असा बदल करण्यास मान्यता देण्यात आली."

**<u>बाब क्र.२ :</u>** **<u>दिनांक १८ नोव्हेंबर, २००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (१९९ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालातील खालील बाब टिप्पणीवर चर्चा झाली व निर्णय घेण्यात आला :-

<u>बाब क्र.३ :- निधी प्रवाह तक्ता सन-२००२-०३ ते २००६-०७</u>

या बाबीवर चर्चा होत असताना महानगर आयुक्त यांनी अमेरिकन दुतावासाच्या अधिका-यांबरोबर पुढील आठवडयात वांद्रे-कुर्ला संकुलातील आवश्यक असलेल्या जागेसाठी बैठक आयोजित केली आहे असे सांगितले. प्राधिकरणाने सार्वजनिक उपक्रमास ज्या दराने भूखंड दिले आहेत त्या दरानेच अमेरिकन दुतावासास भूखंड द्यावा. या दरामध्ये सूट देण्यात येऊ नये असे अमेरिकन दुतावासास बैठकीमध्ये कळवावे असे अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सुचविले.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

**<u>बाब क्र.३ :</u>** **<u>मुंबई नागरी विकास प्रकल्प- फिरता निधी अंतर्गत भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेला एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ योजनेस कर्ज सहाय्य.</u>**

३.१ प्रमुख, नियोजन विभाग यांनी भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणा-या एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ यासाठी रु. १७.१८ कोटी इतके कर्ज देण्याचे प्रस्तावित करण्यात येत असल्याचे नमूद केले. प्रस्तावित कर्ज हे १५ वर्षाकरीता असून व्याजाचा दर ११% आकारण्यात

येणार आहे. तसेच कर्ज देण्याची शिफारस करण्याआधी भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यानुसार नगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली आहे. प्रस्तावित केलेल्या कर्जाचा वार्षिक हफ्ता देण्याची महानगरपालिकेची क्षमता आहे असे दिसते. तरीसुध्दा कर्ज परतफेड नियमित व्हावी यासाठी महानगरपालिकेला बँकेमध्ये स्वतंत्र एस्क्रो खाते उघडण्यास सांगण्यात आलेले आहे व महानगरपालिकेला त्यात प्रति महिना जकात कराच्या १०% रक्कम परंतु कमीत कमी रु.२५ लाख नियमितपणे भरण्याचे बंधन घालण्यात आलेले आहे.

३.२ बँकांचे व्याजदर कमी होत असतांना ११% दर हा योग्य आहे काय याबद्दल काही सदस्यांनी विचारणा केली. अध्यक्षांनी यापूर्वी किती दरांनी कर्जे देण्यात आलेली आहेत याबद्दल विचारणा केली. प्रमुख, नियोजन विभाग यांनी मुं.ना.वि.प्र.- फिरता निधीच्या नियमावलीनुसार व्याजाचा कमीत कमी दर ९% असणे आवश्यक आहे व गेल्या काही वर्षात प्राधिकरणाने प्रथम १२% व नंतर ११ टक्क्यांनी कर्ज दिले असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की बँकांचे ठेवीचे दर जरी कमी होत असले तरीसुध्दा कर्जाचे दर त्या प्रमाणात कमी झालेले नाहीत व आजही काही प्रमुख बँकांचे प्राईम लेन्डींग रेट्स (PLR) हे ११ ते ११.५०% एवढे आहेत. हडकोचा दिर्घ मुदतीच्या कर्जाचा व्याजदर ११.५०% आहे.

३.३ भिवंडीच्या विकासासंबंधी व तेथे उपलब्ध असलेल्या मुलभूत सुविधांबाबत बोलताना प्रधान सचिव (उद्योग) यांनी सांगितले की, भिवंडीची आर्थिक परिस्थिती उत्तम असून तेथे उद्योगांसाठी भरपूर वाव आहे. तथापि, नागरी मुलभूत सुविधा अपु-या असल्यामुळे त्यांचा क्षमतेप्रमाणे विकास होऊ शकत नाही. या मुलभूत सुधारणांसाठी भारत सरकारच्या उद्योग मंत्रालयाच्या इंडस्ट्रीयल क्लस्टर योजनेखाली निधी उपलब्ध असून जर योग्य नियोजन केले व समन्वय साधला तर भिवंडीचा विकास झपाट्याने व उत्तमरीतीने होऊ शकेल. यावर अध्यक्षांनी भिवंडीच्या सर्वांगीण विकासासाठी आराखडा तयार करावा व त्यानुसार आवश्यक ते आर्थिक सहाय्य करावे असे सुचविले. प्रकल्प संचालक व सह-महानगर आयुक्त, मुं.ना.प.प्र. यांनी अशा प्रकारचा विकास आराखडा मुंबई शहरासाठी सुध्दा नसल्याने तसा

आराखडा तयार करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. प्रमुख, नियोजन विभाग यांनी भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर उद्योग आणि गोदामे ही मोठया प्रमाणात झाली असल्याचे सांगितले व या सर्व भागाच्या नियोजनासाठी विशेष नियोजन प्राधिकरण नेमण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे नगर विकास विभागाला शिफारसही करण्यात आलेली आहे असे ते म्हणाले. महानगर आयुक्तांनी मुलभूत विकासासाठी सर्वंकष विकास आराखडा तयार करण्याच्या आवश्यकतेला दुजोरा देताना सूचना केल्या की प्रथम ज्या भागासाठी असा आराखडा तयार करणे आवश्यक आहे तो भाग निश्चित करणे आवश्यक आहे.

३.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला : -

<u>ठराव ८६१</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१ अ अन्वये प्राधिकरणाने ठराव क्र. ४२२, दि. मार्च ३१, १९९० याद्वारे कार्यकारी समितीस हक्क प्रदान केले असून, त्याद्वारे कार्यकारी समिती भिवंडी एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ साठी रु. १७१७.९३ लाख इतकी कर्जाऊ रक्कम भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेला मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** ठरावाची अंमलबजावणी करुन प्रकल्प वेळीच पूर्ण करणे व आगाऊ कर्जसहाय्य देण्याच्या तसेच कर्जाच्या अटी व शर्तीमधील कर्जाची रक्कम, व्याजदर आणि कर्ज परतफेडीचा कालावधी व्यतिरिक्त सुधारणा करणेसाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

## <u>वाव क्र.४ :</u> <u>मुंवईची सद्यस्थिती याबाबतच्या अभ्यासासंबंधीचा प्रस्ताव.</u>

४.१ चर्चेला आरंभ करतांना प्रकल्प संचालक व सह-महानगर आयुक्त व मुं.ना.प.प्र. यांनी मुंबईचे भविष्यातील स्थान (Mumbai Repositioning) व त्यासाठी आवश्यक असणा-या विकास योजना यांचे तात्काळ नियोजन करणे आवश्यक आहे असे मत मा. मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केल्याचे सांगितले व त्यासाठी आवश्यक असणारा अभ्यास करणे अत्यंत जरुरीचे आहे असे सुचविले. श्री. र.य.तांबे, सदस्य यांनी सुचविले की, पूर्वी केलेल्या विविध अभ्यासांचा आढावा घेतल्याशिवाय व नवीन अभ्यासांची आवश्यकता भासल्याशिवाय नवे अभ्यास घेऊ नयेत असे मत व्यक्त केले. प्रधान सचिव (उद्योग) म्हणाले की, उद्योगांचे (मॅनीफॅक्चरींगचे) काय स्थान राहील याद्दलही विचार करणे आवश्यक आहे. ते पुढे म्हणाले की, न्यूयॉर्क, हाँगकाँग, सिंगापूर ही प्रामुख्याने कार्यालयीन किंवा सेवा केंद्रे असली तरी नवीन प्रकारचे उद्योगही या शहरांमध्ये वाढत आहे. मुंबईमध्ये कोणत्या प्रकारच्या नवीन उद्योगांना वाव आहे हे जाणून त्याप्रमाणे त्यांना प्रोत्साहीत करणे हे मुंबईची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी आवश्यक आहे.

४.२ प्रमुख, नियोजन विभाग यांनी बॉम्बे फर्स्ट ही संस्था मेकँझी आणि कंपनी या सल्लागारांच्या मदतीने मुंबईच्या भवितव्याविषयी अभ्यास करणार असून तशाच प्रकारचा वेगळा अभ्यास प्राधिकरणातर्फे घेण्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले. यावर प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त, मुं.ना.प.प्र. यांनी बॉम्बे फर्स्टचा अभ्यास हा आवश्यक तितका सखोल होणार नसल्याचे मत व्यक्त केले. श्री. द.म.सुकथनकर, सदस्य, म्हणाले की, बॉम्बे फर्स्टचा अभ्यास हा केवळ धोरणात्मक शिफारसी करण्यापुरताच मर्यादित असल्यामुळे पुढे वेगळे सखोल अभ्यास घेण्याची आवश्यकता भासेल. त्यामुळे प्राधिकरणाने बॉम्बे फर्स्टच्या अभ्यासाची कार्यकक्षा (Terms of Referance) तपासून त्यात काय बदल करणे आवश्यक आहे हे पहावे व आवश्यकता असल्यास सखोल अभ्यास करण्यासाठी निधीसुध्दा देऊ करावा, असे त्यांनी सुचविले.

४.३ श्री. सुकथनकर यांनी पुढे अशीही सूचना केली की, बॉम्बे फर्स्ट स्थापन करीत असलेल्या सुकाणू समितीवर महानगर आयुक्त, प्रकल्प संचालक व सह-महानगर आयुक्त, मुं.ना.प.प्र. यांचा समावेश करुन बॉम्बे फर्स्टतर्फे करण्यात येणा-या अभ्यासाची रुपरेषा लवकर निश्चित करावी व पुढील बैठकीमध्ये याबाबत आवश्यकतेनुसार प्रस्ताव कार्यकारी समितीपुढे आणावा. या सूचनेचा कार्यकारी समितीने स्वीकार केला. त्यानंतर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, मुंबईसाठी आतापर्यंत केलेल्या सर्व अभ्यासांतर्गत केलेल्या शिफारशींचे संकलन करुन पुढे कशा प्रकारचे अभ्यास करण्याची आवश्यकता आहे हे ठरविणे आवश्यक आहे.

**बाब क्र.५ : विक्रांत युध्दनौकेचे सागरी वस्तुसंग्रहालयात रुपांतर करणे - विक्रांत युध्दनौकेची दुरुस्ती करण्यासाठी भारतीय नौदलास रु.१ कोटी देण्याबाबत.**

५.१ या विषयावर कार्यकारी समितीने सविस्तर चर्चा करुन विक्रांत युध्द नौकेची आकस्मित दुरुस्ती व नौकेची ने-आण या वरील अतिरिक्त खर्च रु.१ कोटीची प्रतिपूर्ती करण्यास आपली मान्यता दिली. तसेच यापुढे या नौकेच्या दुरुस्तीवर करण्यात येणा-या खर्चाची पूर्व कल्पना शासनास/प्राधिकरणास भारतीय नौसेनेने द्यावी त्याशिवाय विक्रांत युध्द नौकेवर खर्च करु नये असेही ठरले.

५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८६२ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ मधील पोट कलम (३) मधील भाग (v) अन्वये कार्यकारी समितीस

दिलेल्या अधिकारांचा वापर करुन विक्रांत युध्द नौकेची आकस्मित दुरुस्ती व नौकेची ने-आण यावरील अतिरिक्त खर्च रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी) ची प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देत आहे. "

**बाब क्र.६ : भारत : मुं.ना.प.प्र.-सीआर-३६६२-आयएन/एलएन-४६६५-आयएन मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी - विक्रोळी जोडरस्त्याच्या कामाने बाधित प्रकल्पग्रस्तांकरीता मजास गावातील प्लॉट नं.१९०-ए/६/१ येथे करण्यात येणारे कायमस्वरुपी गाळयांचे बांधकाम. (पर्याय-अ)**

६.१ अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी) यांनी सभासदांना बाब टिप्पणीतील विषयाची संक्षिप्त कल्पना दिली व सांगितले की, मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांनी सादर केलेल्या निविदेमध्ये अटी व शर्ती नमूद केल्या असल्यामुळे त्यांची निविदा विसंवादी (Non-responsive) असल्याचे जागतिक बँकेने कळविले आहे. त्यामुळे त्यानंतरची मे.बी.ई.बिलीमोरीया अँड कंपनी लिमिटेड यांची न्युनतम प्रतियोगी निविदा (lowest responsive bid) असल्यामुळे त्यांना हे काम देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच त्यांनी दिनांक २६.१२.२००२ च्या पत्रानुसार त्यांनी आधी दिलेल्या निविदेत स्वाधिकाराने (suomoto) २ टक्के सुट देण्याचे ठरविले. सदर प्रस्ताव जागतिक बँकेकडे पाठविण्यात आला होता व त्यास जागतिक बँकेने मान्यता दिली आहे. तरी सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

६.२ चर्चेनंतर, कार्यकारी समितीने प्रस्तावास मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८६३:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३) चे उपकलम(iii) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी

विक्रोळी जोडरस्त्याच्या कामाने बाधीत प्रकल्पग्रस्तांकरीता मजास गावातील प्लॉट नं.१९०-ए/६/१ येथे करण्यात येणारे कायमस्वरुपी गाळयांच्या बांधकामासाठी मेसर्स बी.ई.बिलीमोरीया अँड कंपनी लिमिटेड यांची रु.२४,७१,५६,०००/- (रुपये चोवीस कोटी एकाहत्तर लाख छप्पण्ण हजार) किंमतीच्या न्युनतम मुल्यांकित प्रतियोगी निविदा (lowest evaluated responsive bid) स्विकारण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर ठरावाबाबत योग्य ती कार्यवाही करण्याकरीता प्रकल्प संचालक, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ :** **विकसनशील राष्ट्रांकरीता परिवहन नियोजन व अंमलबजावणी पध्दत - परिवहन प्रकल्प - प्रचालन व देखभाल - कार्यशाळा वित्तीय सहाय्य रु.५०,०००/- खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

चर्चेच्यावेळी सदस्यांनी अशी सूचना केली की, आय.आय.टी.मुंबई येथे भरलेल्या कार्यशाळेचा वृत्तांत किंवा शिफारशी आय.आय.टी. कडून प्राप्त झाल्यानंतर सभासदांना पाठवाव्यात. त्यानंतर कार्यकारी समितीने वरील कार्यशाळेस पेट्रॉन स्पॉन्सरशिप म्हणून दिलेल्या रु.५०,०००/- च्या खर्चास कार्योत्तर मंजूरी दिली व प्रस्तावास मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव ८६४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** परिवहन क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान व परिवहन प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या पध्दती या विषयावर झालेल्या कार्यशाळेला 'पेट्रॉन स्पॉन्सरशिप' म्हणून आय.आय.टी., मुंबई या संस्थेस रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार) वित्त सहाय्य मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे अदा करण्यात आलेले आहेत. त्यास कार्यकारी समिती आपली कार्योत्तर मंजूरी देत आहे."

**बाब क्र.८ : प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल (कालावधी ऑगस्ट, २००२ ते जानेवारी, २००३)**

८.१ मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार यांनी प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी या बाब टिप्पणीची संक्षिप्त कल्पना दिली. प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी माहे ऑगस्ट २००२ ते जानेवारी २००३ मध्ये शासन निर्णय दिनांक ६-८-२००२ मधील मार्गदर्शक तत्वानुसार गुंतविण्यात आलेला आहे. मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार यांनी शासनाकडे मागील वर्षी ठेवण्यात आलेल्या ठेवीचे माहे जून व जुलै २००२ चे हप्ते रु.१३३.३२ कोटी शासनाने व्याजासह परत केलेले नाहीत. सदरहु ठेवीची रक्कम महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडून माहे फेब्रुवारी २००३ पर्यंत परत करण्यात येणार होती ती आजतागायत परत करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ यांच्याकडून प्राधिकरणाची ठेव रक्कम रु.३३५ कोटी व त्यावरील व्याज प्राधिकरणास परत करण्यात आलेले नाही. आयकर कायद्यातून सूट मिळण्यासाठी प्राधिकरणाची नोंद आयकर कायद्यातील कलम १२ (अ) मधील तरतुदीनुसार "ट्रस्ट" म्हणून नोंदणी करुन घेण्यात आली असल्यामुळे प्राधिकरणास आयकर कायद्यातील कलम ११ (५) मधील तरतुदीनुसारच अतिरिक्त ठेवीची गुंतवणूक करणे बंधनकारक आहे. प्राधिकरणाने महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभाग व महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ यांच्याकडे केलेली गुंतवणूक तसेच इतर शासकीय उपक्रमांतील गुंतवणूक मार्च २००३ पूर्वी परत मिळविण्यासाठी प्राधिकरणाने प्रयत्न करावेत असे मे.बन्सी मेहता नामांकित आयकर सल्लागार यांनी मत दिले आहे. अन्यथा, आयकर विभागाकडून प्राधिकरणाच्या गुंतवणुकीवर आक्षेप येण्याची शक्यता आहे व त्यामुळे प्राधिकरणास आयकरातून सूट मिळण्यासही अडचण निर्माण होईल असे मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार यांनी कार्यकारी समितीच्या नजरेस पुन्हा एकदा आणून दिले.

८.२ प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी सांगितले की, शासनाच्यावतीने मुंबई नागरी परिवहन प्रकल्पास प्रतिभाग निधी (Counter part fund) देण्याची जबाबदारी प्राधिकरणावर टाकली असल्यामुळे प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी योग्य वेळी व आवश्यकतेनुसार प्राधिकरणास

परत मिळेल याची काळजी निधी गुंतविताना प्राधिकरणाने घ्यावी. त्यानंतर, प्राधिकरणाने ऑगस्ट, २००२ ते जानेवारी, २००३ पर्यंतचा असलेला अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**<u>बाब क्र.९(अ)</u> : <u>दिनांक ३०.९.२००२ रोजी संपणा-या तिमाहीचे प्राधिकरणाचे त्रैमासिक लेखे.</u>**

दिनांक ३०.९.२००२ रोजी संपणा-या तिमाहीचे प्राधिकरणाचे त्रैमासिक लेख्यांची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**<u>बाब क्र.९(ब)</u> : <u>दिनांक ३१.१२.२००२ रोजी संपणा-या तिमाहीचे प्राधिकरणाचे त्रैमासिक लेखे.</u>**

दिनांक ३१.१२.२००२ रोजी संपणा-या तिमाहीचे प्राधिकरणाचे त्रैमासिक लेख्यांची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**<u>बाब क्र.१०(अ)</u> : <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी तिमाही व्यवस्थापन अहवाल - १ एप्रिल, २००२ ते ३० जून, २००२.</u>**

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी दिनांक १.४.२००२ ते दिनांक ३०.६.२००२ च्या तिमाही अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**<u>बाब क्र.१०(ब)</u> : <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी तिमाही व्यवस्थापन अहवाल - १ जुलै, २००२ ते ३० सप्टेंबर, २००२.</u>**

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी दिनांक १.७.२००२ ते दिनांक ३०.९.२००२ च्या तिमाही अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**बाब क्रमांक ११ : वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रातील जमिनीच्या विक्री बाबतच्या धोरणाचा आढावा.**

प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांनी वांद्रे-कुर्ला संकुलात असलेल्या जमिनीच्या विक्रीच्या धोरणाबाबतची संक्षिप्त माहिती सदस्यांना दिली. वांद्रे-कुर्ला संकुलात असलेल्या जमिनीचा चांगला प्रतिसाद मिळावा या दृष्टीने व्यावसायिक विकासक (Professional Developers) यांचाही प्रवर्गात समावेश करण्यात यावा व त्यांच्याकडून निविदा मागविण्यात याव्यात असे प्रस्तावित केले आहे. यावर साविस्तर चर्चा होऊन कार्यकारी समितीने प्रस्तावास मान्यता दिली. सदरहु व्यावसायिक विकासक यांना या यादीत अंर्तभूत केल्यामुळे त्याचा विपरीत परिणाम होऊ नये याची काळजी प्राधिकरणाने घ्यावी असे मत श्री. तांबे, सदस्य यांनी व्यक्त केले.

**बाब क्रमांक १२ : मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरीता सर्वकष शक्याशक्यता अभ्यास**

१२.१ प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी बाब टिप्पणीबद्दल संक्षिप्त माहिती दिली. हया अगोदर मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरीता मुंबई मेट्रो ग्रुप (MMG) यांनी शासनास अहवाल सादर केला आहे. शासनाने स्थापन केलेल्या तज्ञ समितीने मुंबई मेट्रो प्रकल्पासाठी एक सर्वकष शक्याशक्यता अभ्यास (Feasibility Study) हाती घेण्यासाठी शिफारस केली आहे. त्यासाठी अभ्यासाची कार्यकक्षा (Terms of Reference) तयार करण्यात आली आहे आणि सदर अभ्यास हाती घेण्यास दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (डीएमआरसी) हया संस्थेची शिफारस केली आहे. डीएमआरसी ही संस्था राईटस् व आय.आय.टी., मुंबई यांच्या सहकार्याने हा अभ्यास पूर्ण करणार असून त्यासाठी सुमारे रु.३ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

१२.२ दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन ही संस्था सरकारी संस्था असल्यामुळे व दिल्ली येथील मेट्रो प्रकल्प राबविण्याचा त्यांचा अनुभव लक्षात घेता मुंबई मेट्रो प्रकल्पाचा अभ्यास सर्व बाजू विचारात घेऊन हया संस्थेकडून करण्यात येईल हे गृहित धरले आहे. तसेच सदरहु अभ्यासावर केंद्र शासनाच्या शहरी

विकास व गरीबी उपशयन विभागाकडून सुमारे ४०% खर्चाचे आर्थिक सहाय्य उपलब्ध होऊ शकेल व त्यासाठी प्राधिकरणाकडून केंद्र शासनास विनंती करण्यात येईल असे प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी सांगितले. सदर बाबीवर सविस्तर चर्चा केल्यानंतर कार्यकारी समितीने खाली दिलेल्या बाबींना मंजूरी दिली :-

(अ) सदरहू अभ्यासाची कार्यकक्ष (Term of Reference) यास मंजूरी देणे

(ब) विचारार्थ विषयांना अनुसरुन मुंबई मेट्रो रेल प्रकल्पाकरीता सर्वंकष शक्याशक्यता अभ्यास हाती घेण्यासाठी व २५ कि.मी. एवढया लांबीच्या मार्गासाठी Detailed Project Report तयार करण्यासाठी डीएमआरएसच्या नेतृत्वाखाली अभ्यासगटाची नेमणूक करणे

(क) सदरहू प्रस्तावित अभ्यासाच्या अंदाजित खर्चास मंजूरी देणे जो खर्च रुपये ३.०० कोटी अधिक ५% सेवाकरापेक्षा जास्त होणार नाही.

१२.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८६५</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७(३) (ii) व (iii) आणि ७(५) व याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती पुढील बाबीस मंजूरी देत आहे :-

(१) विचारार्थ विषयांना अनुसरुन मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरीता सर्वंकष शक्याशक्यता अभ्यास हाती घेण्यासाठी व २५ कि.मी. एवढया लांबीच्या मार्गासाठी Detailed Project Report तयार करण्यासाठी डीएमआरएसच्या नेतृत्वाखालील अभ्यासगटाची नेमणूक करणे.

(२) सदरहू प्रस्तावित अभ्यासाच्या अंदाजित खर्चास मंजूरी देणे, जो खर्च रुपये ३ कोटी अधिक ५% सेवाकरापेक्षा जास्त होणार नाही.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** डीएमआरएस कडून प्रस्ताव मागविण्यासाठी, मुल्यमापनासाठी व त्या संदर्भातील चर्चा करण्याकरीता सल्लागारांची नेमणूक करण्याकरीता व त्यांच्या सेवेचे शुल्क अदा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. "

**बाब क्रमांक १३ : अंधेरी-घाटकोपर मार्गावरील स्काय बस मेट्रो प्रकल्पासाठी तांत्रिक-आर्थिक शक्याशक्यता अभ्यास**

१३.१ प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी अशी माहिती दिली की, अंधेरी-घाटकोपर भागाकरीता स्काय बस मेट्रो प्रकल्पाकरीता तांत्रिक-आर्थिक शक्याशक्यता अभ्यास (Techno-Economic Feasibility Study) हाती घेण्यासाठी ज्या सल्लागारांची नेमणूक करण्यात आली होती त्यांनी अभ्यासाच्या भाग-१ आणि भाग-२ चा अंतिम अहवाल प्राधिकरणास सादर केलेला आहे. या अभ्यासाचे महत्वाचे निष्कर्ष बाब टिप्पणीमध्ये पुर्नप्रतिपादीत करण्यात आलेले आहेत. सल्लागारांनी असे नमूद केले की, स्काय बस मेट्रो व्यवस्था राबविणे तांत्रिकदृष्टया शक्य आहे. परंतु सल्लागारांनी या बाबीवर भर दिला की, त्यापूर्वी सुमारे १.८ कि.मी. ते २.० कि.मी. लांबीच्या टेस्ट ट्रॅकवर प्रकल्प अंमलबजावणी करुन निष्कर्ष तपासण्याची गरज आहे. हया टेस्ट ट्रॅक कामासाठी अंदाजे तीन वर्षाचा कालावधी लागेल. त्यामुळे अंधेरी-घाटकोपर सारखे वर्दळीचे स्थान टेस्ट ट्रॅकसाठी योग्य होणार नाही. समितीने असेही नमूद केले की, काही तांत्रिक कार्यकक्षांचा विचार करता आणि संशोधकीय सनद (Patented Items) या बाबीची खात्री करुन घेण्याची आवश्यकता आहे.

१३.२ उपरोक्त परिस्थिती विचारात घेता समितीने असा निर्णय घेतला की, पुढील शिफारसी या महाराष्ट्र शासनास सादर करण्यात याव्यात -

(अ) सल्लागारांनी जो तांत्रिक आर्थिक शक्याशक्यता अभ्यास पूर्ण केला त्यामधून असे निष्पन्न झाले की, सदर तंत्रज्ञान राबविणे शक्य असले तरी त्यासाठी त्यातील तांत्रिक बाबी व सुरक्षेसंबंधी बाबी अधिक जागरुकपणे १.८ कि.मी. लांबीच्या टेस्ट ट्रॅक वर तपासणे आवश्यक आहे.

(व) स्काय बस मेट्रो प्रकल्पाच्या संकल्पनेचे परिक्षण वेगळया ठिकाणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे. भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्यावतीने टेस्ट ट्रॅकच्या विकासाचा जो खर्च होईल त्यासाठी लागणा-या निधीचा निर्णय भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने घ्यावा.

(क) प्रस्तापित मोठया प्रमाणात जलद वाहतूक (Mass Rapid Transit) तंत्रज्ञान हे अंधेरी-घाटकोपर या मार्गावर राबविण्याची शिफारस करण्यात येत आहे. (उदा. जलद रेल्वे आधारीत वाहतूक { Rapid Rail Transit})

१३.३ Rapid Rail Transit System (RRTS) / Light Rail Transit System (LRTS) बाबतचा सविस्तर प्रस्ताव कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत मंजूरीसाठी सादर करण्यात यावा.

## बाब क्रमांक १४ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प - सर्वकष अभियांत्रिकी आराखडे आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लामसलतीकरीता सल्लागारांची संक्षिप्त सूची

१४.१ मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाबाबत कार्यकारी समितीच्या सदस्यांना प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त, मुं.ना.प.प्र. यांनी बाब टिप्पणी बाबत संक्षिप्त माहिती दिली. मे. कन्सलटींग इंजिनिअरींग सर्विसेस या सल्लागाराकडून मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत हाती घेण्यात येणा-या लहान लहान योजनांचा शोध घेण्यात येत आहे व त्यानंतर त्यांची प्राधान्यानुसार क्रमवारी आखण्यात येईल. मे.कन्सलटींग इंजिनिअरींग सर्विसेस यांनी सादर केलेला अहवाल प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. मुंबई नागरी पायाभूत सुविधाचा प्रारुप आराखडा सल्लागारांकडून मिळाल्यानंतर प्रकल्प राबविण्याबाबत अभियांत्रिकी आंराखडे, देकाराचे दस्तऐवज प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तयार करण्यात येणार आहे. प्रकल्प वेळेवर पूर्ण होण्यासाठी तसेच प्रकल्पाचा दर्जा राखण्याकरीता प्रकल्पावर देखरेख करण्याकरीता सल्लागारांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

१४.२ प्रकल्प संचालक व सह-महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सदर प्रकल्प तातडीने हाती घ्यावयाचा असल्यामुळे वेळेत बचत व्हावी म्हणून मुंबई नागरी पायाभूत सुविधाची अंमलबजावणी ज्या संस्थांकडून करण्यात येते उदा. नॅशनल हायवे अॅथॉरिटी ऑफ इंडिया (एनएचएआय), एमएसआरडीसी, सिडको यांच्याकडून सल्लागारांची यादी मागविण्यात आली होती. सर्वसाधारणपणे या संस्था वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन सल्लागारांची संक्षिप्त सूची तयार करतात व सल्लागाराची नेमणूक करतात. वेळेत वचत व्हावी म्हणून ही सूची हया प्रकल्पाकरीता उपयोगात आणण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला आहे. सूचीमध्ये सुमारे ४० सल्लागारांचा समावेश आहे. प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी पूढे असेही नमूद केले की, सूचीतील सल्लागारांकडून तांत्रिक व वित्तीय प्रस्ताव मागविण्यात आले होते. आलेल्या प्रस्तावाची तपासणी मुल्यमापन समितीकडून करण्यात आली. मूल्यमापन समितीने सल्लागारांचा अनुभव त्यांच्याकडून करण्यात आलेली कामे याचा आढावा घेऊन सल्लागारांचे वर्गीकरण अ,ब,क प्रवर्गामध्ये केले. तांत्रिक मुल्यमापनात जे सल्लागार पात्र झाले आहेत त्यांचे वित्तीय देकार विचारात घेण्यात आले आहे. सल्लागारांनी सादर केलेल्या वित्तीय देकारातील शुल्कामध्ये मोठया प्रमाणावर तफावत दिसून आली. फीमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी मुल्यमापन समितीने बाजारात सध्या अनुज्ञेय असलेल्या फी विचारात घेऊन निविदा प्रकल्पासाठी टक्केवारी सूचित केली होती. सदरहु टक्केवारी संबंधित संस्थांना कळविण्यात आली असून त्यांच्याकडून त्यांना त्यास संमती दर्शविलेली आहे असेही प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी समितीस सांगितले.

१४.३ कार्यकारी समितीच्या सदस्यांनी कोणत्या सल्लागारास कोणते काम दिले जाणार आहे त्याच्या पध्दतीबाबत विचारणा केली त्यास प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी एमएसआरडीसी किंवा इतर शासकीय उपक्रमांमध्ये ज्या पध्दतीने कामाचे वाटप सल्लागारांना करण्यात येते तीच पध्दत प्राधिकरणही अवलंबणार आहे असे सादर केले. सदस्यांनी तसेच अध्यक्षांनी सल्लागारांना देण्यात येणा-या कामामध्ये पारदर्शकता असावी त्यासाठी योग्य ती पध्दत अवलंबवावी असे सांगितले.

कार्यकारी समितीने सल्लागारांची सूची तयार करण्याकरीता जी पध्दत अवलंबीली होती त्यास मान्यता दिली, त्याचप्रमाणे बाब टिप्पणीमध्ये शुल्काचा जो दर सूचित केला आहे तो मान्य केला परंतु कार्यकारी समितीने असेही सूचित केले की, सल्लागारांना कामाच्या वाटपाची पध्दत महानगर आयुक्त यांनी निश्चित करावी. तसेच संक्षिप्त केलेल्या सल्लागारांची सूची ही डिसेंबर,२००३ पर्यंत अंमलात राहील.

१४.४ उपरोक्त उल्लेखित परिस्थितीशी अधिन राहून बाब टिप्पणीमधील प्रस्ताव कार्यकारी समितीने मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८६६</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ७(३) (ii) व (iii) आणि याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन बाब टिप्पणीसोबत परिशिष्ट-४ म्हणून जोडण्यात आलेल्या संक्षिप्त सल्लागारांच्या सूचीस कार्यकारी समिती मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीमधील प्रत्येक स्वतंत्र कार्याकरीता शुल्काचे दराचे प्रमाण जे निर्धारीत केलेले आहेत त्यांनासुध्दा कार्यकारी समिती मान्यता देत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७(५) आणि ७(३)(iii) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करुन मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी सखोल अभियांत्रिकी आराखडे व प्रकल्प व्यवस्थापनाच्या कामासाठी

बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेल्या संक्षिप्त सूचीतून योग्य सल्लागाराची निवड करण्यास व दराचे प्रमाण जे निर्धारीत केलेले आहेत त्यापेक्षा जास्त नसलेली फी देण्यास व ज्या सल्लागारांनी निर्धारीत फी पेक्षा कमी फी देकारामध्ये नमूद केली असेल त्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत राबवावयाच्या कामांची निवड करणे व त्यांच्या अंमलबजावणी करण्यास सल्लागारांची निवड करणे व त्यांची नियुक्ती करण्यासाठी कार्यकारी समिती याद्वारे महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्रमांक १५ : मुंबई नागरी पायाभूत सुविधासाठी प्रकल्प - तांत्रिक-आर्थिक शक्यतेच्या अभ्यासाकरीता सल्लागारांची नेमणूक**

१५.१ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ यामध्ये शासनाने सुधारणा केली आहे व बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या प्रदेशातील हद्दीमध्ये पायाभूत सुविधा पुरविणे, त्याच्या दर्जामध्ये सुधारणा करण्याची जबाबदारी प्राधिकरणावर टाकण्यात आलेली आहे. शासनाच्या निदेशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे मुंबई शहरामध्ये विशेषतः उपनगरात रस्त्यांच्या जाळयांची सुधारणा करण्याचा एक प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पांतर्गत घेण्यात येणारी कामे नक्की करण्यासाठी तांत्रिक-आर्थिक शक्याशक्यता अभ्यासाची आवश्यकता असल्यास, सदर अभ्यासाची कार्यकक्षा (Term of Reference) तयार करुन ६ मान्यवर सल्लागार संस्थांकडून देकार मागविण्यात आले. सदर देकाराचे मुल्यमापन समितीकडून केल्यानंतर त्यांच्या शिफारशींनुसार मे.कन्सल्टिंग इंजिनिअरिंग सर्व्हिसेस या सल्लागार संस्थेची निवड करण्यात आली. या अभ्यासाचा एकूण खर्च रु.३८,४६,७५०/- + ५% सेवाकर असा आहे. अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या पूर्व संमतीने

या सल्लागार संस्थांनी सदर अभ्यास डिसेंबरमध्ये सुरु केला असून त्याचा अहवाल एप्रिल मध्ये अपेक्षित आहे

१५.२ वरील बाबीवर चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८६७ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ (३) (ii) व (iii) आणि याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा तांत्रिक आर्थिक शक्याशक्यता अभ्यास हाती घेणे आणि त्यासाठी तयार केलेल्या अभ्यासाची कार्यकक्षा (TORs) सल्लागारांची संक्षिप्त सूची आणि कन्सल्टिंग इंजिनिअरिंग सर्व्हिसेस या सल्लागार संस्थेची तांत्रिक-आर्थिक अभ्यास हाती घेण्यासाठी निवड व त्यासाठी येणा-या रु.३८,४६,७५०/- + ५% सेवाकर यापेक्षा जास्त होणार नाही अशा खर्चास कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** शिफारस केलेल्या प्रकल्पाकरीता वाहतूकीच्या सर्वेक्षणाचा अतिरिक्त खर्च आणि सुमारे १५० कि.मी. लांबीपेक्षा जास्त रस्त्यांच्या जाळयांचे अभियांत्रिकी अन्वेषणास येणारा अतिरिक्त खर्च हा निश्चित केलेल्या दरानुसार प्रतिपूर्तीत करण्यास मंजूरी देत आहे.

"**पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे उदा. वेळेवर अभ्यास तयार करुन घेणे, फी अदा करणे आणि १५० कि.मी. लांबीपेक्षा जास्त रस्त्यांच्या जाळयांचे अभियांत्रिकी अन्वेषणास येणारा अतिरिक्त खर्च निश्चित करणे इ. अधिकार महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहेत."

**बाब क्रमांक १६ : मुंबई शहराकरीता क्षेत्रीय वाहतूक नियंत्रण व्यवस्था (ATC) - पथदर्शक प्रकल्पाची अंमलबजावणी आणि मुंबई शहराच्या विस्तारासाठी सर्वंकष अभियांत्रिकी आराखडे आणि देखभालीच्या कामासाठी सल्लागारांची नेमणूक करण्याबाबत - सद्यस्थितीचा अहवाल**

१६.१ प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी बाब टिप्पणीची सविस्तर माहिती विषद केली. मुंबई बेट शहराच्या संपूर्ण क्षेत्रासाठी क्षेत्रीय वाहतूक नियंत्रण सर्वंकष अभियांत्रिकी आराखडे करणे व त्याची देखभाल करण्याचे काम हाती घेण्यासाठी सल्लागारांच्या नेमणूकीची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

१६.२ यापूर्वी ३५ नाक्यांच्या पथदर्शक अभ्यास हाती घेण्याच्या वेळी मे.पेल फ्रिश्चमन या सल्लागारांची नेमणूक प्रचलित पध्दत अनुसरुन करण्यात आली आहे असे प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी सांगितले. मुंबई बेट शहरातील सुमारे २५० नाक्यांसाठी आवश्यक असलेला क्षेत्रीय वाहतूक नियंत्रण व्यवस्था (ATC) प्रकल्प एमयुटीपी मध्ये समाविष्ट करण्यात यावा अशी जागतिक बँकेच्या प्रतिनिधी मंडळाकडून शिफारस करण्यात आली होती. तसेच यापूर्वी नियुक्ती करण्यात आलेल्या सल्लागाराची नियुक्ती यासुध्दा कामाकरीता करण्यात यावी असेही जागतिक बँकेने सुचविले आहे तसेच सल्लागाराच्या नेमणूकीसाठी एक स्त्रोत पध्दत अवलंबविण्यास जागतिक बँकेने मान्यताही दिलेली आहे. अंतिम प्रस्ताव सल्लागाराकडून मागविण्यात येऊन मुल्यमापन समितीने त्याचे मुल्यमापन केले आहे व सदर सल्लागाराची नेमणूकीसाठी शिफारस केली आहे. कार्यकारी समितीने दिनांक ३ जून, १९९७ रोजी झालेल्या १७४ व्या बैठकीमध्ये एका स्त्रोताच्या आधारे सल्लागारांची नेमणूक करण्याच्या बाबीस सुध्दा मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पाचा संपूर्ण खर्च हा जागतिक बँकेच्या कर्जासाठी पात्र असून याबाबतचे काम हाती घेण्यासाठी सल्लागारांना कार्यदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

१६.३ कार्यकारी समितीने वरील घडामोडींची नोंद घेतली आणि मे.पेल फ्रिश्चमन सल्लागाराने बाब टिप्पणीमध्ये जो खर्च नमूद केलेला आहे अशा रु.१,९९,९४,६८४/- + सेवाकराच्या खर्चास सल्लामसलतीचे कार्य हाती घेण्यासाठी मे.पेल फ्रिश्चमन यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यासाठी मंजूरी दिली.

१६.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८६८ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ (३) (ii) व (iii) आणि याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती क्षेत्रीय वाहतूक नियंत्रण व्यवस्था (ATC) पथदर्शक प्रकल्पाची अंमलबजावणी आणि मुंबई बेट शहरातील सर्व विकासासाठी अभियांत्रिकी आराखडे तयार करणे आणि देखभालीच्या कामासाठी मे.पेल फ्रिश्चमन यांची रु.१,९९,९४,६८४ + सेवा आकाराच्या खर्चात व सल्लागार म्हणून नेमणूक एक स्त्रोत पध्दतीवर करण्यासाठी कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. "

बाब क्र.१७ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - रेल्वेवरील वरपूलांकरीता (ROB) देकारांचे दस्तऐवज, अंदाजित खर्चाचे आराखडे, सर्वंकष संकल्पचित्र अद्ययावत करण्याबाबत.

१७.१ चर्चेच्यावेळी प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे विशद केले की, जोगेश्वरी (उत्तर),जोगेश्वरी (दक्षिण) व विक्रोळी येथील वरपूलांकरीता (ROBs) हे प्रकल्प मुं.ना.प.प्रकल्पामध्ये

समाविष्ट असून त्यांचे सर्वंकष अभियांत्रिकी आराखडे व निविदा पेपरस् १९९८ साली तयार करण्यात आले. परंतु गेल्या चार वर्षात झालेल्या घडामोडींमुळे / बदलामुळे व जागतिक बँकेने सुचविलेल्या बदलांमुळे तसेच जागतिक बँकेच्या प्रोक्युअरमेंट पध्दतीतपण बदल झाल्यामुळे वरील संकल्पचित्र व अभियांत्रिकी आराखडे अद्ययावत करणे आवश्यक आहेत. तसेच विक्रोळी येथे मोठया प्रमाणावर वाणिज्यिक गाळे बाधित होत असल्यामुळे त्याचे पुनर्वसन कमीतकमी करण्यासाठी व जोगेश्वरी (दक्षिण) येथील बहुमजली औद्योगिक वसाहत शाबुत राखण्यासाठी अभियांत्रिकी आराखडे सुधारणे जरुरीचे आहे. जागतिक बँकेच्या पथकाने सदर सुधारीत संकल्पचित्र आणि सुधारीत देकाराचे दस्तऐवज तातडीने करण्यास सांगितले आहे.

१७.२ यापूर्वी विल्बर स्मिथ अँड असोसिएट्स यांना हयाच कामासाठी सल्लागार म्हणून नेमण्यात आले होते. त्यामुळे आराखडे अद्ययावत करण्यासंदर्भात त्यांच्याशी विचारविनिमय करण्यात आला. त्यांनी या कामास होकार दिला असून अंदाजित खर्च रु.२९.८० लाख दर्शविला आहे. सदर काम हाती घेण्यासाठी येणा-या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी घेतली आहे. सल्लागारांची नेमणूक करण्यापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुन्हा खर्चाची प्रतिपूर्तीबद्दल खात्री करुन घ्यावी असे ठरले.

१७.३ वर उल्लेखिलेल्या सर्व गोष्टींचा विचार करुन कार्यकारी समितीने खालील बाबींना मंजूरी दिली आहे :-

(अ) या आधीच्या करारास मुदतवाढ म्हणून विल्बर स्मिथ असोसिएटसतर्फे सुधारीत आराखडे आणि सुधारित संकल्पचित्र देकारांच्या दस्तऐवजांसहित तयार करण्याचे काम करुन घेण्यात यावे.

(ब) रु.२९.८० लाख आणि ५% सेवाकरापेक्षा जास्त नाही एवढया एकूण खर्चाच्या अभ्यासाकरीता सल्लागारांची निवड करुन नेमणूक करणे.

(क) प्राधिकरणाचे महानगर आयुक्त यांना याबाबत पावले उचलण्यासाठी प्राधिकृत करण्यात यावे.

१७.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव ८६९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७(३)(ii) व (iii) आणि याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन याद्वारे कार्यकारी समिती अशी मान्यता देत आहे की, रुपये २९ लाख ८० हजार + ५ % सेवा कर या एकूण खर्चापेक्षा जास्त नाही अशा खर्चाच्या आधारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या टप्पा-१ मधील ३ रेल्वे वरपूलांचा समावेश असलेले प्रकल्पाकरीता सुधारीत अभियांत्रिकी आराखडे, खर्चाचे अंदाजित आराखडे आणि देकारांचे दस्तऐवज तयार करण्यासाठी या आधी सल्लामसलतीच्या कामासाठी जो करार करण्यात आला होता त्या करारास मुदतवाढ देऊन त्याद्वारे विल्बर स्मिथ असोसिएट्स यांची नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यात आली.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** हया ३ रेल्वे वरपूलाचे आराखडे तयार करण्याकरीता यापूर्वी सल्लागारांवर झालेला व यापुढे होणारा खर्च बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वसूल करण्यात यावा.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाचे महानगर आयुक्त यांना सल्लागारांच्या नेमणूकीसंबंधी पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी आणि अभ्यासावर नियंत्रण ठेवण्यासाठी याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. "

बाब क्र.१८ : जोगेश्वरी (दक्षिण) वरपूल, जोगेश्वरी (उत्तर) वरपूल व जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता (JVLR) या मुं.ना.प.प्रकल्प प्रस्तावाच्या अंमलबजावणीमुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसाहत व पुनर्वसन कार्याच्या अंमलबजावणीसाठी मदत करण्यासाठी एकमेव स्त्रोत या तत्वावर (sole source) स्लम रिहॅबिलीटेशन सोसायटी (SRS) या सेवाभावी संस्थेची नेमणूक करणे.

१८.१ चर्चेच्यावेळी प्रकल्प संचालक व सह-महानगर आयुक्त, मुं.ना.प.प्र. यांनी असे विशद केले की, मुं.ना.प.प्र. मध्ये समाविष्ट केलेल्या रस्ते प्रकल्पामुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसाहत

व पुनर्वसन करण्यासाठी पुनर्वसन अंमलबजावणी योजना (Rehabilitation Implementing Project) व सामाजिक पर्यावरण व्यवस्थापन योजना (Community Environment Manangement Project) तयार करण्यात आले आहेत. तसेच त्यांच्यासाठी कायमस्वरुपी सदनिका बांधण्याचे कंत्राट लवकरच देण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्त पुनर्वसाहतीच्या अंमलबजावणीच्या कामी सहाय्य करण्यासाठी सेवाभावी संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास जागतिक बँकेने संमती दिली आहे. स्लम रिहॅबिलीटेशन सोसायटी ही संस्था सदर कामी पहिल्यापासून निगडीत असल्यामुळे या संस्थेला एकमेव स्त्रोत पध्दतीवर हे काम करावयास देण्याचा प्रस्ताव आहे. तसेच ही संस्था झोपडपट्टी विकास कामात गेली १५ वर्षे कार्यरत आहे. जागतिक बँकेने सदर नेमणूक करण्यासाठीच्या अभ्यासास, तांत्रिक व आर्थिक मुल्यमापन तसेच यामध्ये करावयाच्या करारास मान्यता दिली आहे.

१८.२. कार्यकारी समितीने वरील गोष्टी विचारात घेऊन स्लम रिहॅबिलीटेशन सोसायटी या संस्थेस पुनर्वसाहतीच्या अंमलबजावणीसाठी मदत करण्यास एकमेव स्त्रोत या तत्वावर नेमणूक करण्यास मंजूरी दिली तसेच त्यासाठी येणा-या रु.२८,५२,०००/- + सेवाकर या खर्चास पण कार्योत्तर मंजूरी दिली.

१८.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव ८७० :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७(३)(ii) व (iii) आणि याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती जागेश्वरी (दक्षिण) वरपूल, जोगेश्वरी (उत्तर) वरपूल व जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प प्रस्तावाच्या अंमलबजावणीमुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसाहत व पुनर्वसन कार्याच्या अंमलबजावणीसाठी मदत करण्यासाठी एकमेव स्त्रोत या तत्वावर स्लम रिहॅबिलीटेशन सोसायटीची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास कार्योत्तर

मंजूरी देत आहे. तसेच त्यासाठी येणा-या रु.२८,५२,०००/- + सेवाकर या खर्चास कार्योत्तर मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१९ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी तिमाही व्यवस्थापन अहवाल दिनांक १ ऑक्टोबर, २००२ ते दिनांक ३१ डिसेंबर, २००२**

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी दिनांक १.१०.२००२ ते दिनांक ३१.१२.२००२ च्या तिमाही अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**पटल बाब : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावर नेमणूक करण्याबाबत.**

महानगर आयुक्त यांनी सांगितले की, श्री.धांगुर्डे, विद्यमान प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग हे दिनांक २८ फेब्रुवारी, २००३ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार आहेत. हे पद महत्वाचे असल्यामुळे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन या पदासाठी अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या एकूण ४१ अर्जांची छाननी केली असता फक्त ५ उमेदवार या पदासाठी पात्र असल्याचे दिसून आले. प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावर नेमणूक करण्यासाठी या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने एक निवड समिती गठीत केली असून त्यामध्ये मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन व अध्यक्ष, कार्यकारी समिती, प्रधान सचिव, नगर विकास विभाग आणि महानगर आयुक्त हे सदस्य आहेत. प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग हे पद तांत्रिकदृष्टया महत्वाचे असल्यामुळे श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती आणि डॉ.पी.जी.पाटणकर, सल्लागार, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, या परिवहन क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींनाही निवड समितीवर निमंत्रित केले होते. दिनांक १४ फेब्रुवारी, २००३ रोजी या निवड समितीने उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. एकूण ५

पैकी ४ उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित राहिले. उमेदवारांच्या मुलाखती घेतल्यानंतर निवड समितीने श्री.पी.आर.के.मूर्ती यांना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावर नियुक्त करावे अशी शिफारस केली आहे. त्यानुसार श्री.पी.आर.के.मूर्ती यांना दिनांक ३ मार्च, २००३ पासून प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावर नियुक्त करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

त्यानंतर, पटल बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८७१ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७(३)(१) च्या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावर श्री.पी.आर.के.मूर्ती यांची, दिनांक ३ मार्च, २००३ पासून रु.१६४००-४५०-२०००० या वेतनश्रेणीत नेमणूक करण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे."

मा.अध्यक्षांची सूचना –

अध्यक्ष, यांनी उड्डाणपूलाच्या खाली असलेली जमीन वाणिज्यिक वापरासाठी देण्याबाबतचा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी पाठविलेला प्रस्ताव प्राधिकरणाकडे प्रलंबित आहे यावर तातडीने कार्यवाही करण्याची सूचना संबंधितांना दिली.

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********